अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# गणपतीपूर्वी राज्यात टोलवसुलीचे विसर्जन

महाराष्ट्रातल्या निवडणुकांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी राज्यभरातली टोलवसुली बंद करण्याचा निर्णय लवकरच घेतला जाण्याची शक्यता आहे. सामान्य माणसाची मने जिंकायची असतील तर तीन-चार गोष्टी आघाडी सरकारच्या हातात शिल्लक राहिल्या आहेत. एक म्हणजे टोलवसुली रद्द करणे, प्रचंड महाग होत असलेल्या घरांचा प्रश्न सोडवणे, त्यासाठी भरावा लागणाऱ्या प्रचंड स्टँपड्युटीमध्ये सवलत देणे, महिला आणि युवा वर्गाचा पाठिंबा मिळवण्याकरता स्वतंत्र योजना जाहीर करणे तसेच व्यापाऱ्यांसाठी अतिशय डोकेदुखी ठरलेली एलबीटी रद्द करणे अशा काही गोष्टी तातडीने केल्या तर काँग्रेसला थोडाफार आधार मिळू शकतो. आज संपूर्ण राज्यभरामध्ये टोल, स्टँपड्युटी आणि एलबीटीविरोधात असंतोष दिसत आहे. या तीनही गोष्टी एकूण राज्याच्या प्रगतीमध्ये अडथळे निर्माण करणाऱ्या आहेत असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. संपूर्ण राज्यात आज शंभरापेक्षा जास्त टोलनाके आहेत. मुंबईपासून नागपूरपर्यंत किंवा इकडे सोलापूर कोल्हापूरपर्यंत प्रवास करायचा झाला तर प्रत्येक वाहनचालकाला सहज पाचशे रुपयांचा टोल भुर्दंड बसतो. रस्त्यांचा खर्च भरून काढण्यासाठी या टोलची आवश्यकता जरी असली खर्च वसूल झाल्यानंतरही आकारला जाणारा हाजिझीया कर सरकार थांबवू शकलेली नाही. आज परिस्थिती अशी आहे की, रस्ते बांधणाऱ्या कंत्राटदारांना सरकार टोलला परवानगी देणार असेल तरच रस्ते बांधण्यामध्ये स्वारस्य दिसून येते. सरकार टोलची परवानगी देणार नसेल तर अनेक कॉन्ट्रॅक्टर हे कंत्राट स्वीकारायलाही पुढे येत नाहीत. म्हणजे ज्याठिकाणी कंत्राटदारांनी सरकारच्या अटी आणि शर्थी पाळल्या पाहिजेत तिथे आज कंत्राटदार सरकारच्या अटी आणि नियम घालून देत आहेत. नव्या मुंबईतले दोन प्रकल्प टोलवसुलीला परवानगी न दिल्यामुळे रखडले आहेत. तर अनेक मोठ्या प्रकल्पांबाबत सरकारने मर्यादित काळासाठी टोलवसुली करण्याची परवानगी दिल्यामुळे त्या प्रकल्पातून काही कंत्राटदारांनी माघार घेतल्याचे दिसून येते. यावरून टोल हा प्रकार लोकांच्या हिताचा नाही. तो कंत्राटदारांसाठी तिजोरी भरणारा हमखास उपाय ठरलेला दिसतो. आतापर्यंत राजकारणी सत्ताधारी आणि कंत्राटदार यांच्या भागीदारीतून सर्रासपणे टोलवसुली होत राहिली. पण आता जर निवडणुका जिंकायच्या असतील तर टोल रद्द करण्याचा भुर्दंड सरकारला भरावा लागेल. काँग्रेसच्या राज्यभरातल्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर यासंदर्भात दबाव आणलेला आहे.

### एलबीटीचे भिजत घोंगडे

स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर मुख्यमंत्र्यांनी काही नव्या घोषणाही केल्या. त्यात कुलाबा, बांद्रा, एअरपोर्ट अंधेरी या मार्गावरच्या मेट्रोचे भूमिपूजन टोलवसुलीला नवा पर्याय तसेच सामान्य माणसाला परवडणारी घरे या गोष्टींचा त्यात समावेश होता. मात्र एलबीटीबाबत सरकारने धरसोड वृत्ती बाळगल्याने याबाबतही फेरविचार करण्याची गरज काँग्रेसकडूनच व्यक्त होत आहे. गेले वर्ष-दोन वर्षे एलबीटीविरोधात व्यापाऱ्यांचा आक्रोश सुरू आहे. त्याचा जबरदस्त फटका काँग्रेसला लोकसभा निवडणुकीत बसला. आणि आता एलबीटी घ्यायची की, जकात ठेवायची याबाबत त्या त्या महापालिकांनी निर्णय घ्यावा. अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतल्यामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. एलबीटीबाबतचीही नरो वा कुंजरोवाची मुख्यमंत्र्यांची भूमिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धोकादायक ठरू शकते. राज्याचा व्यापारउदीम नीट चालायचा असेल, रोजगार वाढवायचा असेल तर सरकारने तातडीने उद्योग आणि व्यापारविषयक सुधारणा केल्या पाहिजेत. केवळ महापालिकांचे पोट भरण्यासाठी सगळा भार व्यापाऱ्यांवर टाकणे हा काही उपाय ठरू शकत नाही. यासाठी वेगळ्या पध्दतीचा अवलंब करता येऊ शकतो. व्हॅटच्या बरोबरीने थोडा कर जास्त घेऊन त्यातला काही भाग महापालिकांना राज्य सरकारने दिला पाहिजे. ही व्यवस्था आपल्याकडून नीट पाळली जाईल किंवा नाही याची राज्य सरकारलाच भीती वाटते. म्हणूनच एलबीटीची विटी पुन्हा महापालिकांच्या मैदानात ढकलून मुख्यमंत्री जबाबदारी झटकू पाहत आहेत. रस्त्यांवरून वसूल केला जाणारा टोल काय किंवा दुकानदारांना भरावा लागणारा एलबीटी काय, या दोन्ही गोष्टी अनाठायी भुर्दंडासारख्याच ठरतात. यासंदर्भात तातडीने पर्यायी उपाययोजना करणे जास्त योग्य ठरते. कारण आज विकासाची गती वाढवायची असेल तर अडथळे दूर केले पाहिजेत. जगभरातल्या अनेक शहरांमध्ये किंवा देशांमध्ये व्यापारउद्योग करणाऱ्या घटकांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जाते. आपल्याकडे मात्र सरकारच उपकार कर्त्याची भूमिका घेऊन अडवणूक करत असते. एखादा प्रकल्प सुरू करण्यासाठी सरकारी कार्यालयात स्वागत होणार नाही. उलट त्याला विलंब कसा लावता येईल असेच प्रयत्न होतात. आता जर पराभवाच्या भीतीने का होईना, सत्ताधारी पक्षाच्या डोक्यात प्रकाश पडणार असेल तर त्यांनी सर्वप्रथम टोल आणि एलबीटीचे गणपतीपूर्वी विसर्जन करावे. तरच त्यांच्या सत्तेची प्रतिष्ठापना होण्याची थोडीफार आशा निर्माण होईल.

### सामान्यांना घरे द्या

आज महाराष्ट्राची लोकसंख्या अकरा कोटींच्या घरात आहे. त्यातल्या चार ते पाच कोटी लोकांकडे स्वत:ची घरे नाहीत. अनेकांना शहरांमध्ये घरे घेणे परवडत नाही, कारण सरकारनेच घराच्या किमती आटोक्यात ठेवण्यासाठी कोणताच प्रयत्न केला नाही. बिल्डरांना व्हॅट भरावा लागतो.त्यामुळे ते घरांच्या किमती वाढवतात हा व्हॅट ते घरखरेदी करणाऱ्यांकडून वसूल करतात. याशिवाय स्टँपड्युटीमध्ये जबरदस्त वाढ करून सामान्य माणसाला हैराण करण्याचे सुरू आहे. एकीकडे घरांचा तुटवडा तर दुसरीकडे सरकारच्याच करवाढीचा फटका अशा दुहेरी कोंडीमुळे राज्यभरातल्या सामान्य माणसाला आपल्या घराचे स्वप्न पूर्ण करणे कठीण जाते. मुख्यमंत्र्यांनी सर्वांना परवडणारी घरे देण्याची घोषणा एकीकडे केली असताना दुसरीकडे बड्या बिल्डरांच्या दबावाखाली एमएमआरडीएच्या घरप्रकल्पांच्या फायली दाबल्या गेल्या आहेत. ठाणे आणि मुंबईत एमएमआरडीएचे घरप्रकल्प होणार होते. त्याला गती देण्याऐवजी एका बड्या बिल्डरला मेगा सिटी निर्माण करण्याकरता हे प्रकल्प रोखून धरल्याची चर्चा आहे. असा हा दुटप्पीपणा होणार असेल तर त्याचा निवडणुकीमध्ये निश्चितच फटका बसू शकतो.आचारसंहिता लागू होण्यापूर्वी या स्वस्त घरप्रकल्पांची ब्ल्यू प्रिंट सरकारने दिली तर त्याचा लाभ होऊ शकेल.